शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १४७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## भरवस्तीत तरुणावर अंदाधुंद गोळीबाराने जालन्यात खळबळ



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात दिनांक २३ (शुक्रवार) रोजी रात्री झालेल्या थरारक गोळीबाराच्या घटनेने संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. शहरातील वर्दळीचा भाग असलेल्या नूतन वसाहत परिसरातील घाटी रोडवर, एका बाल रुग्णालयासमोर अज्ञात हल्लेखोरांनी २७ वर्षीय तरुणावर गावठी पिस्तूलमधून अंदाधुंद गोळीबार केला. या घटनेत संबंधित तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी दिली आहे.

घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, चरण रायमल्लू (वय २७, रा. घाटी रोड परिसर) असे गोळीबारात जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी रात्री आठ ते साडेआठ वाजेच्या सुमारास चरण हा घाटी रोडवरील बाल रुग्णालयासमोरून जात असताना, आधीच दबा धरून बसलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी त्याला अडवले. काही कळायच्या आतच हल्लेखोरांनी त्यांच्या जवळील गावठी पिस्तूलमधून एकामागून एक गोळ्या झाडल्या. गोळ्या वर्मी लागल्याने चरण हा रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. त्याला गंभीर अवस्थेत तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. गोळीबार केल्यानंतर हल्लेखोरांनी घटनास्थळावरून पळ काढला. भरवस्तीत अचानक झालेल्या गोळीबाराच्या आवाजाने परिसरात प्रचंड पळापळ झाली. नागरिकांनी भीतीपोटी दुकाने बंद केली, तर काही काळासाठी घाटी रोडवरील वाहतूकही ठप्प झाली होती.

घटनेची माहिती मिळताच पोलीस यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाली. पंचनामा करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणी पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक अनंत कुलकर्णी, स्थागुशा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आणि कदीम जालना पोलीस ठाण्याचा फौजफाटा घटनास्थळी उपस्थित होता.

हा हल्ला पूर्ववैमनस्यातून झाला की इतर कोणत्या कारणातून, याचा तपास पोलीस करत आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची कसून तपासणी सुरू असून आरोपींचा माग काढण्यासाठी वेगवेगळ्या दिशांना पथके रवाना करण्यात आली आहेत. या घटनेमुळे जालना शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. भरदिवसा वर्दळीच्या परिसरात झालेल्या या गोळीबारामुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, पोलिसांनी गुन्हेगारीवर कठोर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

पोलीस प्रशासनाने लवकरच आरोपींना अटक करण्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

## आरोग्यदायी परिसरासाठी स्वच्छता अभियान

### प्रभाग १ मध्ये भास्कर दानवे यांचा पुढाकार

**जालना । प्रतिनिधी -** शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १ मधील स्व. गोपीनाथराव मुंडे चौक येथे नगरसेवक पदी प्रथमच निवड झाल्यानंतर परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्याच्या उद्देशाने स्वच्छता व साफसफाई मोहिमेचे आयोजन करण्यात आले.

या मोहिमेद्वारे चौक तसेच आजूबाजूच्या परिसरातील कचरा हटवून सर्वत्र स्वच्छता करण्यात आली. या उपक्रमात नगरसेवक श्री. भास्कर आबा दानवे, नगरसेविका सौ. सुशिला दानवे, सौ. ज्योती रवी सले, सौ. पद्मा अजित मानधानी व श्री. कल्याण भदनेकर यांनी सक्रिय सहभाग घेतला.

तसेच स्वच्छता प्रमुख श्री. चाको, श्री. गणेश सुतार यांच्यासह स्वच्छता विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना नगरसेवक भास्कर आबा दानवे यांनी नागरिकांना स्वच्छतेबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले. प्रभागातील सर्व परिसर स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी ठेवण्यासाठी अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



## नामस्मरणाने जीवन जगण्याची प्रेरणा - महेश गिरी महाराज

### राधाकृष्ण महाराज प्रभात फेरी चे १२ वर्षी पदार्पण

**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील राममंदिर येथून मागील अकरा वर्षापासून राजूर येथील भागवत कथा समाप्ती च्या पहिल्या दिवशी भजन संध्या होऊन सकाळी परम पूज्यनिय श्री राधाकृष्ण महाराज यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये सुरू झालेली प्रभात फेरी अजून नित्य नियम सुरू असून या निमित्ताने आपले मनोगत पंगत चुकली तर चालले मात्र संगत चुकली नाही पाहिजे असे सांगून सुरू असलेल्या या फेरी ला उपस्थिती लाऊन श्री ज्ञानेश्वर माऊली यांनी आपले भाव व्यक्त केले.

आपल्या आशीर्वाद वाणी तून परम पूज्यनिय महेश गिरी महाराज यांनी या वेळी आपला भाव व्यक्त करत मी सुद्धा फेरीचा एक भाग असून मला माहित आहे की मागील ११ वर्षा पासून सुरू असलेली ही फेरी साक्षात देवा ची आठवण करून देणारी आहे. २३ तारखेपासून सुरू असलेल्या गौरी आश्रम गोंधनखेडा येथील भव्य जपानुष्ठाण सुरू होत असून या साठी आमंत्रण देऊन सुरू असलेल्या प्रभात फेरी बद्दल आपले भाव व्यक्त करत नित्य नियमाने सुरू असलेले कार्य खूप फलदायी आणि अनेकाना प्रेरणा देणारे असून नामस्मरण ही सगळ्या मोठी भक्ती असून सकाळी टेंभुर्णी येथील सुरू असलेल्या फेरी मुळे या भावाचे भाग्य चांगले असून नामस्मरण करणारा आणि ऐकणारे ही भाग्यवान असतात. या फेरी मुळे अध्यात्म आणि ज्ञान



दोन्ही जपल्या जाते. कारण ही तुम्ही सोबत ठेवलेल्या सगळ्यात मोठी संपती होय असे मत मांडले सोबत या फेरी मुळे वाजल्या जाणाऱ्या टाळ्या मुळे मुलात संस्कार वर्धी आणि आजारात कमी पना येते हे महत्वाचे.या छोट्या खाणी कार्यक्रमाचे सूत्र संचलन संजय राऊत तर प्रस्ताविक रघुराम उखर्डे यांनी केले तर आभार अलकेश सोमाणी यांनी केले.

या प्रभात फेरी मध्ये रघुराम साहेब उखर्डे, भीमराव जमधडे,अंबादास भोरे, संजय राऊत,रामदास खरात,संजय बोडखे सुरज जांगिड,अतुल बूजाडे, बाबुराव जाधव, गजानन डोइफोडे, दिनेश जाधव गणेशलाल सोमाणी,नागेश डोमळे,संतोष शिंदे,यांच्या सह अनेक महिला पुरुष उपस्थित होते.

## बाळासाहेब ठाकरे यांच्यासोबत घालवलेले क्षण हे आयुष्यभर प्रेरणा देणारे - आ. अर्जुनराव खोतकर

### हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी निमित्त जालन्यात भव्य रक्तदान शिबिर संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी (जयंती) निमित्त जालना शहरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिवसेना संपर्क कार्यालय, भाग्यनगर, जुना जालना येथे आयोजित हा सामाजिक उपक्रम मोठ्या उत्साहात आणि जनसहभागात पार पडला.

या रक्तदान शिबिराला शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक-युवती तसेच शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. ''रक्तदान म्हणजे जीवनदान'' या प्रेरणादायी संदेशासह शिवसैनिकांनी सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान करून बाळासाहेब ठाकरे यांना भावपूर्ण अभिवादन केले.

मान्यवरांची प्रमुख उपस्थिती

या कार्यक्रमास शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यासह शिवसेनेचे जिल्हा, शहर व तालुकास्तरीय पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारधारेचा गौरव करत समाजसेवेचे महत्त्व अधोरेखित केले. रक्तदान शिबिरामुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. विविध संघटनांचा सक्रिय सहभाग

या सामाजिक उपक्रमात शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, किसान सेना, दलित आघाडी, शिक्षक सेना, कामगार सेना तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सक्रिय सहभागी झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवसैनिकांनी विशेष परिश्रम घेतले.

उपस्थित मान्यवर

या कार्यक्रमास शिवसेना संपर्कप्रमुख पंडित दादा भुतेकर, जिल्हा संपर्कप्रमुख भास्कररावजी आंबेकर, ॲड. सुनील किनगावकर, अनिरुद्ध खोतकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, ॲड. भास्कर मगरे, शहरप्रमुख विष्णू पाचफुले, नगरसेवक दुर्गेश कठोठीवाले, नानासाहेब





वानखेडे, गणेश सुपारकर, लक्ष्मण अवघड, नगरसेवक तथा युवासेना जिल्हाध्यक्ष अमोल ठाकूर, जावेद भाई, वसंतराजे जाधव, कैलास चव्हाण, सुभाष बोडके, विजयाताई चौधरी, छाया काळे, आशाताई, नजीर भाई शेख, जफर खान, महेश दुसाने, बाला परदेशी, राजेंद्र परिहार, अरुण डोळसे, संतोष रासवे, किरण शिरसाट, संजय गायकवाड, योगेश रत्नपारखे, सखाराम लंके, बिलाल सौदागर, संताजी वाघमारे, यश ठाकूर तसेच जालना व बदनापूर तालुक्यातील शिवसेना व युवासेनेचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रक्तदान करणारे रक्तदाते

या रक्तदान शिबिरात गणेश उत्तम वराडे, रामेश्वर त्र्यंबक टोकरे, अजय दिगंबर मस्के, नंदू विनायक अंभोरे, शेख खलील शेख नजीर, अरविंद किसन भोसले, नीरज राजेंद्र मंत्री, गणेश राजकुमार काटकम, भागवत ज्ञानेश्वर डोंगरे, तुकाराम एकनाथ डोंगरे, ओमकार वसंतराव चित्राल, ओमकार श्रीनिवास, शिवाजी दत्ता लाड, मनोज देवरे, किरण भाऊसाहेब रत्नपारखे, दुर्गेश किसनलाल कठोठीवाले, विशाल मधुकर इंगळे, सागर सुधाकर पाटील, गणेश जगन्नाथ क्षीरसागर, कैलास रतनलालजी कुमार, आकाश संतोष भागडे, बिलाल एजाज सौदागर, रोहित संजय बोर्डे, राम दिलीप शेजुळ, सुरज कल्याण पालखी, बबन राम वाघमारे, अक्षय संजय गिराम, स्वप्नील सोनाजी कोकाटे, ज्ञानेश्वर वामनराव डोंगरे यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

जालना ब्लड बँकेचे सहकार्य

या रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी जालना ब्लड बँकच्या टीमचे विशेष सहकार्य लाभले.

सामाजिक ऐक्याचा संदेश

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या रक्तदान शिबिरामुळे समाजात सामाजिक ऐक्य, सेवाभाव आणि मानवतेचा संदेश पोहोचल्याचे चित्र दिसून आले.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या आठवणींना उजाळा आमदार अर्जुनराव खोतकर यांची भावुक प्रतिक्रिया

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी आणि नेतृत्वाने प्रेरित झालेल्या असंख्य कार्यकर्त्यांपैकी आमदार अर्जुनराव खोतकर हे एक ठळक नाव आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या सहवासातील जुने दिवस आठवत आमदार अर्जुनराव खोतकर यांनी त्या आठवणींना उजाळा दिला.

बाळासाहेब ठाकरे यांचे मार्गदर्शन, स्पष्ट विचारधारा आणि समाजासाठीचे योगदान आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. ''बाळासाहेब ठाकरे यांचे विचार हे केवळ राजकारणापुरते मर्यादित नव्हते, तर समाज परिवर्तनाचे शक्तिशाली साधन होते,'' असे मत त्यांनी व्यक्त केले.

त्यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने सामान्य जनतेसाठी उभे केलेले संघर्ष आणि आंदोलन आजही स्मरणात असल्याचे आमदार खोतकर यांनी सांगितले.

# संपादकीय पान

## आण्विक शक्तीचे जनक

भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज स्मृतिदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जे चा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. २४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या माँ ब्लँ या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

# हिंदुविरोधी व्यवस्थेचा बळी : समीर गायकवाड

''सरकार किसीकी भी हो, व्यवस्था तो हमारी है,'' हा केवळ 'सिने-संवाद' नाही, तर ते आजचे विदारक वास्तव आहे. स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षांत राज्यकर्त्यांनी निर्माण केलेली ही व्यवस्था इतकी बुरसटलेली आहे की, सत्ता कुणाचीही असो, व्यवस्थेचा 'हिंदुविरोधी' आणि 'देशविरोधी' चेहरा सहसा बदलत नाही. याच व्यवस्थेत देशविरोधी घोषणा देणाऱ्यांना आणि नक्षलवाद्यांना 'विचारवंत' म्हणून डोक्यावर घेतले जाते, तर दुसरीकडे राष्ट्रहिताचा विचार करणाऱ्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाते. याच पक्षपाती व्यवस्थेच्या दिरंगाईचा आणि जाचाचा बळी ठरले आहेत, सनातन संस्थेचे निष्पाप साधक समीर गायकवाड! समीर यांचा मृत्यू हा केवळ एका व्यक्तीचा मृत्यू नसून, एका निर्दोष जीवाचा या निष्ठुर व्यवस्थेने घेतलेला बळी आहे.

समीर यांच्या मृत्यूला कारणीभूत कोण? : गेल्या दशकात दाभोलकर-पानसरे-कलबुर्गी-गौरी लंकेश या हत्या प्रकरणांची प्रचंड चर्चा झाली. माध्यमांनी या व्यक्तींना अवास्तव प्रसिद्धी देऊन मोठे केले; परंतु या हत्यांचा तपास निष्पक्षपणे करण्याऐवजी, एका विशिष्ट विचारसरणीला लक्ष्य करण्यासाठी आणि 'भगव्या दहशतवादा'चे खोटे नॅरेटिव्ह रुजवण्यासाठी तपास यंत्रणांचा वापर झाला. तपासातील त्रुटी म्हणजे हत्येमागे आर्थिक वाद, कौटुंबिक कलह, बाईचे प्रकरण किंवा व्यावसायिक शत्रुत्व असे अनेक पैलू असू शकतात; मात्र तपास यंत्रणांनी केवळ 'सनातन संस्थे'ला लक्ष्य करून चारही हत्यांचा सखोल तपास न करता 'कॉपी-पेस्ट' पद्धतीचे आरोपपत्र प्रत्येक ठिकाणी दाखल केले.

समीर यांना २०१५ मध्ये कॉ. गोविंद पानसरे हत्या प्रकरणात नाहक अटक करण्यात आली. एका गाडीवरून आलेल्या दोन मारेकऱ्यांनी हत्या केली. त्यातील एक समीर गायकवाड आहे, असे तपास यंत्रणांनी सांगितले. वास्तविक हत्येच्या दिवशी समीर गायकवाड हे पालघरला होते. तपासादरम्यान पोलिसांनाही त्यांच्या कॉल डिटेल्सद्वारे आढळून आले की, पानसरेंच्या हत्येच्या दिवशी समीर गायकवाड पालघर येथे होते; पण कोणाच्या दबावामुळे त्यांनी ते न्यायालयासमोर आणले नाही, याचा तपास व्हायला हवा ! उलट एक शाळकरी मुलगा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणून आणला, त्याने समीर यांना ओळखले; पण वर्षभरातच समीर खूनी नसून ते दोन खूनी भलतेच आहेत म्हणून जाहीर केले. काही महिन्यांनी पुन्हा नवीन दोन नावे समोर आणली. मग दुसरे दोन जर हत्यारे असतील, तर पहिल्यांवरचे आरोप रहित केले पाहिजे होते; पण ते हेतूतः केले गेले नाहीत. याचा अर्थ, समीर निर्दोष असल्याचे माहीत असल्याने त्यांचा खटला चालवायचा नाही आणि दुसरीकडे त्यांचे नाव असलेले पहिले दोषारोपपत्र कायम ठेवून त्यांचा समाजिक जीवन उद्ध्वस्त करून छळही करायचा, ही असुरी प्रवृत्ती आहे.

या हेतुपुरस्कर व खोट्या तपासामुळे समीर गायकवाड यांच्यासारख्या पापभिरू साधकाचे आयुष्य उद्ध्वस्त झाले. खोट्या आरोपांमुळे झालेली बदनामी आणि न्यायालयीन प्रक्रियेचा ताण यांमुळे सार्वजनिक आणि जीवन जगण्यात येत असलेल्या अडचणी यांमुळे समीर प्रचंड ताणाखाली होते आणि यामुळेच समीर यांना हृदयविकाराचा झटका आला असे त्याचे कुटुंबीय ठामपणे सांगत आहेत. हा नैर्सगकि मृत्यू नसून, हिंदुविरोधी व्यवस्थेने, डाव्या विचारसरणीच्या टोळ्यांनी आणि तपास यंत्रणांनी केलेल्या 'खोट्या आरोपांचा बळी' आहे.

निर्दोषत्वाचा सर्वात मोठा पुरावा : 'खटला चालवा' ही मागणी! : समीर गायकवाड यांचे निर्दोषत्व सिद्ध करणारी सर्वात मोठी गोष्ट म्हणजे त्यांची आणि त्यांच्या वकिलांची भूमिका. सर्वसाधारणपणे गुन्हेगार खटला लांबवण्याचा प्रयत्न करतात. मात्र, या प्रकरणात समीर गायकवाड यांनी स्वतः हून ''माझा खटला लवकरात लवकर चालवा,'' अशी लेखी मागणी केली होती. दुसरीकडे, पानसरे कुटुंबीय आणि तपास यंत्रणा मात्र खटला रेंगाळत ठेवण्याचा प्रयत्न करत होत्या. अजमल कसाबसारख्या नराधम अतिरेक्याला सरकारी खर्चाने वकील मिळतो; मात्र केवळ एक हिंदु, सनातन संस्थेचा साधक आणि गरीब शेतकऱ्याचा मुलगा आहे म्हणून समीर यांना वकील मिळू दिला जात नाही. दहशतवादाच्या गुन्ह्यात शिक्षा ठोठावलेल्या अतिरेक्यासाठी मध्यरात्री सर्वोच्च न्यायालय उघडते; पण संविधानाच्या गप्पा मारणारे समीर यांच्या मूलभूत अधिकारांचे हनन करतात, ही लोकशाहीची थट्टा आहे.

खोटे नॅरेटिव्ह हाणून पाडा : आजच्या व्यवस्थेत 'हाऊस अरेस्ट'चे कोणतेही प्रावधान नाही; पण तरीही पंतप्रधानांच्या हत्येचा कट रचणाऱ्या शहरी नक्षलवाद्यांच्या मुसक्या आवळण्याऐवजी त्यांना 'हाऊस अरेस्ट' करण्याचे फर्मान सोडले जातात. भीमा कोरेगाव प्रकरणातील आरोपी स्टॅन स्वामी यांच्या मृत्यूनंतर न्याय व्यवस्थेकडून शोक व्यक्त होतो; काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेससह अनेक विरोधी पक्षनेत्यांनी सामाजिक माध्यमांवर व्यक्त होऊन भाजप सरकारवर टीका केली. तसेच थेट संयुक्त राष्ट्र संघाकडून शोक व्यक्त करणारे प्रसिद्धीपत्रक जारी केले जाते. यातून इकोसिस्टीम किती मोठी आहे हे समजते. 'भारत तेरे तुकडे होंगे'च्या घोषणा देणारा उमर खालिद याची कारागृहातून सुटका व्हावी, यासाठी न्यूयॉर्कचे महापौर ममदानी पत्र लिहितात. समीर गायकवाड हे या हिंदुविरोधी नॅरेटिव्हचे बळी ठरले आहेत. त्यांच्यासाठी कोण पत्र लिहिल का, कोण आवाज उठवणार का?, हा प्रश्न आहे. जर भविष्यात असे बळी जाऊ द्यायचे नसतील, तर देशरक्षण आणि धर्मरक्षणाची तळमळ असणाऱ्यांनी एकत्र येणे काळाची गरज आहे. केवळ फील गुड अर्थात् 'सर्व काही छान चालले आहे' या भ्रमात न राहता, या व्यवस्थेतील डाव्या विचारसरणीच्या आणि तथाकथित पुरोगाम्यांचा ढोंगीपणा उघडा पाडणे आणि हिंदुविरोधी अपप्रचाराच्या विरोधात सक्षमपणे लढा देणे, हीच समीर गायकवाड यांना वाहिलेली खरी श्रद्धांजली ठरेल!

**श्री. चेतन राजहंस,**
**राष्ट्रीय प्रवक्ते, सनातन संस्था**

# सोन्याचांदीच्या भडकणाऱ्या किमतीं आणि सामान्य माणूस!

सोनं ही चैनीची वस्तू मानली जाते. परंतु भारतासारख्या सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात सोन्याशिवाय चैन न पडणाऱ्यांची संख्या जास्त आहे. अर्थात जागतिक स्तरावर दागदागिन्यांशिवाय सोन्याकडे गुंतवणूक म्हणून अधिक पाहिले जात आहे. वाढती मागणी आणि सोन्याचा कमी पुरवठा हे बाजाराचे समीकरण लक्षात घेतले तर सोन्याचांदीच्या वाढणाऱ्या किमतीमागचे अर्थकारणही लक्षात येते. आज संपूर्ण जगात आर्थिक पातळीवर बरीच अस्थिरता आहे. अमेरिकेचे व्यापारविषयक दडपशाहीचे धोरण आणि स्वतःच्या स्वार्थासाठी जगातल्या अनेक देशांना टेरिफच्या माध्यमातून तडाखे देण्याचा प्रकार अमेरिकेकडून होतो आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत अमेरिकन डॉलर कमकुवत होते आहे. स्वाभाविकपणे जगातील श्रीमंत देश असतील किंवा त्यांच्या देशातील मध्यवर्ती बँका असतील या सध्या सोने खरेदीवर जास्त लक्ष केंद्रीत करीत आहेत. आपली अर्थव्यवस्था अधिकाधिक सुरक्षित ठेवण्याकरीता अधिकाधिक सोने खरेदीचा पर्याय त्यांनी निवडला आहे. म्हणूनच आज अमेरिकेचे बदलते धोरण आणि मोठ्या देशांकडून होणारी सोनेखरेदी अर्थकारणावर परिणाम करते आहे. आता तर अटलांटिक महासागर परिसरातल्या ग्रीन लँडवर अमेरिकेची नजर गेली आहे. अंटार्टिका परिसरात किंवा डेन्मार्कचा भाग मानल्या जाणाऱ्या ग्रीन लँडमध्ये बरीच मोठी नैर्सगकि साधनसंपत्ती आहे. तिथल्या तेलाच्या साठ्यांपासून ते इतर सागर संपत्तीचा आपल्याला अधिकाधिक उपयोग करून घेता यावा म्हणून ते ताब्यात घेण्याची मोहिमही अमेरिकेने सुरू केली आहे. या सगळ्या अस्थिर परिस्थितीचादेखील अर्थकारणावर परिणाम होत असल्याने सोन्यापाठोपाठ चांदीच्या किमती भडकताना दिसतात. आज सोन्याची किंमत १ लाख ६० हजार रुपयांपर्यंत पोहोचली तर चांदीची किंमत किलोमागे ३ लाख १० हजारांपर्यंत जाऊन पोहोचते आहे. या दोघांमध्येही किंमतवाढीची जणूकाही स्पर्धा लागलेली दिसते. पुढची एक दोन वर्षे हा प्रकार असाच चालू राहण्याचा प्रकार आहे. जागतिक अर्थकारण आणि सोन्याच्या वाढणाऱ्या किमती यामध्ये अविकसित देश आणि भारतासारख्या विकसनशील देशांना सर्वाधिक फटका बसतो आहे.

भारत हा एकाअर्थी सोन्यावर प्रेम करणारा देश ठरतो. भारतातली सर्वाधिक लोकसंख्या गुंतवणूकीपेक्षाही लग्नसमारंभ आणि वेळ अडचणीला उपयोगी पडणारे सोने नाणे याच दृष्टीने त्याकडे पाहिले जाते. म्हणून भारतीय समाजातली ही मानसिकता लक्षात घेऊन आणि देशाच्या अर्थकारणाचा विचार करून भारतातल्या सोन्याच्या किमती सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर जाणार नाहीत, अशी धोरणं सरकारला राबवता आली पाहिजेत. अन्यथा सोने ही फक्त पैसेवाल्यांची आणि धनदांडग्यांचीच मक्तेदारी होऊन बसेल. एकीकडे देशातल्या आर्थिक समानतेचा विचार मांडला जात असतो. मात्र त्याचवेळी सोन्याचांदीसारखी किंमतवाढ पाहिली की, त्यातून आर्थिक विषमतेला खतपाणीच घातले जाते. जगात घडणाऱ्या सगळ्याच गोष्टींचा भारतावर असा परिणाम होणार असेल तर त्यातून सामान्य माणसाचे जनजीवन अस्थिर आणि असुरक्षित होत राहील. सरकारकडून भारताची अर्थव्यवस्था भक्कम असल्याचे ढोल बडवले जातात. जगातल्या अनेक व्यवस्था डामाडौल असताना भारताची अर्थव्यवस्था कशी टिकून आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न होतो. म्हणजे मग जगापेक्षा भारतीय अर्थव्यवस्था भक्कम असेल तर मग जगातल्या या सोनेचांदीच्या किंमतवाढीचा भारतावर इतका मोठा परिणाम होण्याची गरज नाही. यासाठी केंद्र सरकारला अधिक कौशल्याने आपले धोरण आखावे लागेल. अन्यथा एकीकडे अर्थव्यवस्था भक्कम आहे असे म्हणत सोन्याचांदीच्या भडकणाऱ्या किमतींबाबत बघ्याची भूमिका त्रासदायक ठरू शकते. आजही भारताच्या समाजव्यवस्थेमध्ये सामान्य माणूस आणि कृषीप्रधान व्यवस्था महत्त्वाची ठरते...!!

**ह.भ.प. शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी**
**कागल-कोल्हापूर.**

# ''हिंद-की-चादर'' श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमात जास्तीत-जास्त भविकांनी सहभागी व्हावे

**जालना । प्रतिनिधी -** ''हिंद-की-चादर'' श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमवर्षानिमित्त नांदेड येथे दिनांक २४ व २५ जानेवारी, २०२६ रोजी कार्यक्रम आयोजित करण्यित आले आहे. या ऐतिहासिक कार्यक्रम जिल्ह्यातील जास्तीत-जास्त भाविकांना उपस्थित राहता यावेह यासाठी जालना जिल्हा प्रशासनामार्फत विविध माध्यमतून व्यापक प्रचार प्रसिध्दी मोहिम राबविण्यात आली.




यामध्ये २,४४४ प्राथमिक, माध्यमिक व उच्चव माध्यरमिक शाळा व महाविद्यालय मध्येल दररोज प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच दि. २१ जानेवारी, २०२६ रोजी जालना शहरात आयोजित करण्यात आलेल्या महारॅलीत सुमारे १० हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. तसेच जिल्ह्यातील सर्व शाळांमध्येद श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या जीवन कार्यावर आधारित गीत व माहितीपट दाखवण्याहत आला. तसेच जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये निबंध/वत्कृात्वि/ चित्रकाला स्पोर्धाचे आयोजन करुन जिल्ह्या तील एकूण १५ विजेत्यांरची व ५ संस्थोची निवड करण्याात आली आहे. जालना जिल्ह्यातील सर्व शहरामध्येय व गावांमध्ये हिंद-दी-चादर' कार्यक्रमाचे होर्डींग लावण्यित आले आहेत. तसेच जिल्ह्यातील सिनेमागृहात श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या जीवन कार्यावर आधारित गीत व माहितीपट दाखवण्यातत आला. हा ऐतिहासिक कार्यक्रमाच्याह यशस्वीख आयोजनासाठी जालना जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी व समाजातील दानशुर व्य क्तींलची जिल्हा धिकारी आशिमा मित्तल यांनी वेळोवळी बैठका घेवून कार्यक्रमासाठी मदत करण्या चे आवाहन केले होते. त्या नुसार जालना जिल्ह्यातील उद्योगपती, व्या पारी व इतर नागरीकांनी भरीव स्वकरुपाची मदत केली असुन, सदर मदत नांदेड येथे पोहचविण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी जालना जिल्ह्यातून जाणाऱ्या स्वचयंसेवकांना व्यापारी महासंघातर्फे टि शर्ट पुरविण्या त आले आहे. तसेच इतरही नागरीकांनी स्वाखर्चाने नांदेड येथे किराणा मालाचे साहीत्यं पोहोच केले आहे. या कार्यक्रमासाठी भाविकांना जाणे-येण्यासाठी प्रशासनामार्फत वाहनांची देखील व्यावस्थाल करण्याआत आलेली आहे. या भव्य ऐतिहासिक कार्यक्रमास जिल्ह्यातील भाविकांनी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हारधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

# फ्युचर वर्सिटी आणि एनएईएमडी आयोजित ''जोश २०२५'' मध्ये युवा ऊर्जेला मिळाले नवे व्यासपीठ

फ्युचर वर्सिटीएनएईएमडी जोश २०२५, नेस्ट अकॅडमी ऑफ इव्हेंट मॅनेजमेंट अँड डेव्हलपमेंट अंतर्गत फ्युचर वर्सिटीचा प्रमुख आंतरमहाविद्यालयीन महोत्सव, यशस्वीरीत्या पार पडला. ''आपली सामूहिक शक्ती मानवतेपासून अनंतापर्यंत'' या संकल्पनेवर आधारित जोश २०२५ मध्ये मुंबई आणि महाराष्ट्रातील १२० हून अधिक महाविद्यालयांमधून २,५०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी निवड फेऱ्या आणि अंतिम फेरीत सहभाग घेतला.
हा संपूर्ण महोत्सव नेस्ट अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी संकल्पित व अंमलात आणला असून, विद्यार्थी गायन स्पर्धा, फ्युजन नृत्य, फॅशन शो आणि बँड स्पर्धा यांद्वारे सहकार्य, सर्जनशीलता आणि युवा अभिव्यक्तीचा उत्सव साजरा करण्यात आला. बांद्रा येथील बाल गंधर्व रंगमंदिरात आयोजित जोश अंतिम फेरीत विविध महाविद्यालयीन परिसरांमध्ये पार पडलेल्या अनेक निवड फ ेऱ्यांतून निवडलेले स्पर्धकांनी ऊर्जावान आणि प्रभावी सादरीकरण केले.
या महोत्सवाचे परीक्षण मान्यवर परीक्षक मंडळाने केले, ज्यामध्ये २०२५ अंतर्गत रंगमंच कलाकार आणि भारतीय पार्श्वगायिका अर्पिता चक्रवर्ती तसेच गायक आणि गीतकार ऋषभ पंचाल यांनी विद्यार्थी गायन आणि बँड स्पर्धांचे परीक्षण केले, फॅशन शो आणि फ्युजन नृत्य विभागाचे परीक्षण मॉडेल, अभिनेत्री आणि प्रशिक्षित नृत्यांगना शाइना लेबाना यांनी केले, तर चित्रपट दिग्दर्शक विजय लालवानी आणि गायक व संगीत दिग्दर्शक रोहित श्याम राऊत यांनी सर्व विभागांसाठी परीक्षक म्हणून जबाबदारी सांभाळली; त्याचबरोबर फ ेमिना मिस इंडिया महाराष्ट्र २०२५ साठी फेमिना मिस इंडिया महाराष्ट्र २०२४ आणि फेमिना मिस इंडिया पश्चिम २०२४ अर्शिया राशीद, मिस इंडिया महाराष्ट्र २०२२ दिशा पाटील, भारतीय अभिनेत्री आणि बिग बॉस मराठी पहिल्या सत्राची द्वितीय उपविजेती स्मिता गोंडकर, मॉडेल आणि प्रभावशाली व्यक्तिमत्त्व अश्विनी आहेर, युरी वुरी संस्थापक श्रीमती आरती श्रीवास्तव, डेंटोक्राफ्ट संस्थापक डॉ. निदा ख़तीब तसेच दूरदर्शन आणि हिंदी




चित्रपट अभिनेत्री सिमरन सचदेवा यांचा समावेश होता, ज्यामुळे या व्यासपीठाला प्रगल्भ उद्योग दृष्टीकोन आणि विश्वासार्हता मिळाली. या महोत्सवाच्या मूळ संकल्पनेला अनुसरून आणि समाजाप्रती आपली जबाबदारी निभावत, विद्यार्थ्यांनी रेस्क्यू फाउंडेशनला भेट देऊन तेथील रहिवाशांसोबत संवादात्मक उपक्रम राबवले तसेच संस्थेसाठी मदत सामग्री संकलित केली. याशिवाय, मुंबईतील ५० हून अधिक स्वयंसेवी संस्थांना भेट देत त्यांच्या समाजसेवेतील योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.
फ्युचर वर्सिटीएनएईएमडी आपल्या विद्यार्थ्यांच्या करुणा, संघभावना आणि समर्पणाचा अभिमान व्यक्त करते, कारण त्यांच्या प्रयत्नांतून ''आपली सामूहिक शक्ती'' ही संकल्पना प्रत्यक्षात साकार झाली.
जोश २०२५ आणि फ ेमिना मिस इंडिया महाराष्ट्र उपक्रमाने एकत्रितपणे महत्त्वाकांक्षा, सहकार्य आणि उत्कृष्टतेचा उत्सव साजरा करणारे एक सशक्त व्यासपीठ निर्माण केले, जे सामूहिक शक्तीचे खरे प्रतीक ठरले. माध्यमे आणि मनोरंजन उद्योगातील जागतिक स्तरावरील नामांकित कार्यक्रमांचा भाग होण्यासाठी, प्रत्यक्ष अनुभव, उद्योगाभिमुख शिक्षण आणि प्रशिक्षणावर आधारित करिअरकडे आपले पहिले पाऊल उचला. वर्ष २०२६ साठी प्रवेश प्रक्रिया आता सुरू आहे.

युवा आदर्श | जालना | शनिवार, दि २४ जानेवारी २०२६ | E-mail- yuva.aadarsh@gmail.com


# ६५ दिवसांचा संसार, दशकभराची न्यायालयीन लढाई; सर्वोच्च न्यायालयाने अखेर दिला घटस्फोट

**जालना | प्रतिनिधी -** केवळ ६५ दिवस एकत्र संसार केल्यानंतर तब्बल एक दशकाहून अधिक काळ एकमेकांविरुद्ध ४० पेक्षा जास्त खटले दाखल करून न्यायालयांना रणांगण बनवणाऱ्या एका जोडप्याचा विवाह सर्वोच्च न्यायालयाने आपल्या विशेष अधिकाराचा वापर करून संपुष्टात आणला आहे.

वैवाहिक नातेसंबंध पूर्णपणे तुटले असून ते पुन्हा जुळण्याची कोणतीही शक्यता उरलेली नाही, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. तथापि, न्यायालयाची दिशाभूल करण्याच्या आणि खोट्या शपथेवर साक्ष देण्याच्या (परजरी) प्रकरणांना मात्र यातून वगळण्यात आले असून ते खटले पुढे चालणार आहेत.

या प्रकरणात, पती-पत्नीचे लग्न २०१२ मध्ये झाले होते, परंतु लग्नानंतर अवघ्या दोन महिन्यांतच त्यांच्यात वाद सुरू झाले आणि ते विभक्त झाले. तेव्हापासून दोघांनीही एकमेकांवर कौटुंबिक हिंसाचार, छळ, पोटगी आणि इतर अनेक प्रकारचे दिवाणी व फौजदारी खटले विविध न्यायालयांमध्ये दाखल केले. या दीर्घकालीन कायदेशीर लढाईमुळे दोघांचेही आयुष्य उद्ध्वस्त झाले होते. पत्नीने सर्वोच्च न्यायालयात एका

खटल्याच्या हस्तांतरणासाठी याचिका दाखल केली होती, ज्यादरम्यान तिने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४२ अंतर्गत न्यायालयाला विवाहव मोडण्याची विनंती केली.

सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची सखोल दखल घेतली. न्यायालयाने म्हटले की, ''जेव्हा पती-पत्नी एक दशकाहून अधिक काळ वेगळे राहत असतील, त्यांच्यात समेट घडवून आणण्याचे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरले असतील आणि त्यांच्यातील कटुता इतकी वाढली असेल की पुन्हा एकत्र

येणे अशक्य आहे, तेव्हा अशा नात्याला केवळ कायदेशीर बंधनात अडकवून ठेवणे अन्यायकारक आहे.'' न्यायालयाने शिल्पा शैलेश प्रकरणातील निकालाचा संदर्भ देत सांगितले की, अशा स्थितीत न्यायालय आपल्या विशेष अधिकाराचा वापर करून घटस्फोट मंजूर करू शकते,जरी दुसऱ्या पक्षाची संमती नसली तरीही.

या निकालाद्वारे सर्वोच्च न्यायालयाने वैवाहिक वादांमध्ये गुंतलेल्या सर्व पक्षांना एक महत्त्वाचा संदेश दिला आहे. न्यायालयाने म्हटले की, ''सध्याच्या काळात पती-पत्नी किरकोळ वादातून एकमेकांना धडा शिकवण्यासाठी न्यायालयांना रणांगण बनवत आहेत, ज्यामुळे न्यायव्यवस्थेवर अनावश्यक भार पडत आहे.'' न्यायालयाने पुढे असेही नमूद केले की, कोणताही वाद पोलिसांपर्यंत नेण्यापूर्वी किंवा न्यायालयात जाण्यापूर्वी

मध्यस्थीसारख्या पर्यायांचा वापर करायला हवा. यामुळे अनेक संसार वाचू शकतात आणि कटुता टाळता येते.

या प्रकरणातील सर्वात लक्षवेधी बाब म्हणजे न्यायालयाने इतर सर्व खटले रद्द केले असले तरी, खोट्या शपथेवर साक्ष दिल्याबद्दल दाखल करण्यात आलेले अर्ज (पूर्वीच्या फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३४० आणि नवीन भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम ३७९ अंतर्गत) चालू ठेवण्याचे आदेश दिले आहेत. ''न्यायाचा प्रवाह कोणीही दूषित करू शकत नाही,'' असे सांगत न्यायालयाने स्पष्ट केले की, न्यायालयासमोर खोटे बोलणे किंवा खोटी कागदपत्रे सादर करणे हा एक गंभीर गुन्हा आहे आणि अशा प्रवृत्तींना खपवून घेतले जाणार नाही.

ॲड. महेश एस. धनावत (विधीज्ञ) यांचे मतः ''सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल अत्यंत संतुलित आणि दूरगामी परिणाम करणारा आहे. एका बाजूला, न्यायालयाने एक मृत वैवाहिक नाते संपुष्टात आणून दोन्ही पक्षांना आयुष्यात पुढे जाण्याची संधी दिली आहे, ही एक स्वागतार्ह बाब आहे. तर दुसऱ्या बाजूला, खोट्या साक्षीचे खटले चालू ठेवून, न्यायालयीन प्रक्रियेचा गैरवापर सहन केला जाणार नाही, असा सज्जड इशारा दिला आहे. या निर्णयामुळे लोकांना वैवाहिक वाद सामोपचाराने आणि मध्यस्थीने सोडवण्यासाठी प्रोत्साहन मिळेल.'' अखेरीस, न्यायालयाने या जोडप्याला केवळ घटस्फोटच दिला नाही, तर दशकभर चाललेल्या अनावश्यक खटलेबाजीमुळे न्यायालयाचा मौल्यवान

वेळ वाया घालवल्याबद्दल दोघांनाही प्रत्येकी दहा हजार रुपयांचा दंड ठोठावला. या प्रकरणातून समाजाला हे शिकायला मिळते की, वैवाहिक नात्यात संयम, सामंजस्य आणि एकमेकांबद्दल आदर असणे आवश्यक आहे. लहानसहान मतभेदांना मोठे स्वरूप देऊन कायदेशीर लढाईत उतरल्यास दोन्ही पक्षांचे केवळ आर्थिक आणि मानसिक नुकसानच होते.

## नामदार भरतशेठ गोगावले यांच्या उपस्थितीत मुगवली येथील श्री स्वयंभू गणपती मंदिरात श्री गणेश जयंती उत्सव उत्साहात साजरा



**बोरघर | माणगाव | प्रतिनिधी -** माणगाव तालुक्यातील श्री क्षेत्र स्वयंभू गणपती मंदिर मुगवली येथे दर वर्षीप्रमाणे यंदाही श्री गणरायांचा जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावात साजरा करण्यात आला. या पावन उत्सवानिमित्त सालाबाद प्रमाणे नामदार भरत शेठ गोगावले यांनी मंदिरात उपस्थित राहून श्री गणरायाचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर परिसरात उपस्थित असलेल्या गणेशभक्तांशी त्यांनी संवाद साधून जन्मोत्सवाच्या आयोजनाबाबत चर्चा केली. माणगाव तालुक्यातील मुगवली येथील हा श्रींचा जन्मोत्सव सोहळा भाविकांसाठी विशेष महत्त्वाचा असून, दूरदूरहून भक्त मोठ्या श्रद्धेने येथे दर्शनासाठी येत असतात. तसेच या यात्रेनिमित्त नामदार भरत शेठ गोगावले यांनी आपल्या कार्यकर्ते भोसले दाम्पत्यांनी लावलेल्या खाद्यपदार्थांच्या स्टॉलला भेट देत तेथील पदार्थांची चव घेतली व त्यांच्या व्यवसायाला मनापासून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी समस्त विश्वस्त मंडळ, माणगाव तालुक्यातील शिवसेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक, व मोठ्या संख्येने गणेश भक्त उपस्थित होते.

## खेळातून शिकणे महत्त्वाचे - जनार्दन झोरे

### गुरुकुल शाळेत क्रीडा महोत्सव थाटात संपन्न

**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील गुरुकुल विद्या मंदिर येथे या वर्षी चे क्रीडा महोत्सव मोठ्या आनंदाने साजरा करण्यात आला.या वेळी कार्यक्रमाच्या मुख्य मंचावर मोठी उपस्थिती होती.या मध्ये प्रमुख प्रा दत्तात्रेय देशमुख,गौतम म्हस्के ,जनार्दन झोरे, लक्ष्मण शिंदे,रावसाहेब अंभोरे, शिवाजी मुळे, गणेश सातभाई, बालाजी शेवाळे, अजय सातभाई, शेख अशपाक, फकिरबा पाचे, दिंगबर भिसे, दगडुबा तांबेकर, सुनील भाले, अलकेश सोमाणी यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी अलकेश सोमाणी रावसाहेब अंभोरे गौतम म्हस्के प्रा. दत्तात्रेय देशमुख,यांनी आपली मनोगत मांडली.या वेळी सरपंच प्रतिनिधी म्हणून म्हस्के यांनी शाळेसाठी सगळी मदत करण्याची हमी दिली. शाळेत शिक्षण सोबत खेळाला ही खूप महत्व असून त्या मुळे तुमचे शिक्षण घेता वेळी उत्साह वाढतो असे आपले मत देशमुख यांनी मांडले.या वेळी खेळातून आपली आणि शाळेची प्रगती होईल असे असून शासनाच्या आदेश मुळे सगळे खेळ करून आपल्या देशाचे नाव मोठे करण्याचे स्वप्न पूर्ण करण्याचे या वेळी उपस्थितांनी मांडले.या वेळी शाळेचे प्रमुख श्री विजय सातभाई यांनी शाळेची सर्व माहिती आलेख सर्वांसमोर ठेवले आणि आलेल्या प्रमुख पाहुणे यांचे आभार मानले. या वेळी निसर्गमय वातावरण मध्ये घेण्यात आलेल्या शालेय क्रीडा स्पर्धेत सगळे पालक विद्यार्थी शिक्षक शिक्षिका यांनी मनसोक्त आनंद घेत लहान मुलांच्या सगळ्या खेळाला टाळ्याच्या भरभरून प्रतिसाद देत त्यांचे कौतुक केले.गुरुकुल विद्या मंदिर ही टेंभुर्णी येथील लहान मुलांची सर्वात मोठी शाळा असून येथे पालक वर्गाची मोठी गर्दी होती.



## बैलगाडा शर्यत म्हणजे शेतकरी व ग्रामीण संस्कृतीचा गौरव - बोराडे

**मंठा । प्रतिनिधी -** हिंदुहृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त मंठा तालुक्यातील आर्डा (खारी) येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य तालुकाप्रमुख बैलगाडा शर्यत अत्यंत अटीतटीच्या सामन्यांनी आणि थरारक वातावरणात संपन्न झाली. या शर्यतीमध्ये जिल्ह्यासह राज्यातील नामांकित अडीचशेहून अधिक बैलगाडा मालकांनी सहभाग नोंदवला होता. २ लाख २ हजार रुपयांच्या एकूण बक्षिसांच्या या जंगी मैदानात बैलगाडा शौकीनांच्या डोळ्यांचे पारणे फिटले.

या शर्यतीचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे, शिवसेना नेते प्रल्हादराव बोराडे व तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या हस्ते झाले.या शर्यतीत प्रथम बक्षीस ५१,००० उदयसिंह बोराडे यांच्या तर्फे, तर द्वितीय बक्षीस ४१,००० माजी सभापती संतोषराव वरकड, तृतीय बक्षीस ३१,०००माजी उपसभापती किसनराव मोरे, चतुर्थ बक्षीस २१००० योगेश पाटील अवचार, तसेच रतन कळणे, अंबादास बोराडे, निलेश जोजरे, दिलीपराव कव्हले, दत्तराव चव्हाण, प्रदीप अवचार यांच्यातर्फे आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली होती.

शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धे चे अत्यंत शिस्तबद्ध नियोजन करण्यात आले. शर्यतीच्या ठिकाणी येणाऱ्या प्रत्येक बैलगाडा मालकाची आणि प्रेक्षकांची विशेष काळजी घेण्यात आली. शर्यतीदरम्यान सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्यात आले. ''अशी मोठी स्पर्धा मंठा तालुक्यात पहिल्यांदाच पाहायला मिळाली,'' अशी भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली.विजेत्या बैलगाडा मालकांनी गुलालाची उधळण करत आपल्या विजयाचा आनंद साजरा केला.

याप्रसंगी तुळशीरामजी कुहिरे परमेश्वरा उबाळे संजय राठोड रामराव वरकड बाळासाहेब देशमुख अक्षयदीप वाघमारे विठ्ठल नानोटे दिनकर मातने नाथा दिवटे अमोल विरकर विजय बागल विकास गिराम विनोद खरात कृष्णा बोराडे भगवान बोराडे पवन वाघमारे दादाराव खंदारे भरत नरोटे राम नरोटे पप्पू बोराडे जयदेव चव्हाण गोपी डेंगळे विनोद प्रधान तसेच पंचक्रोशीतील बैलगाडा प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्षाकडून खडकी-राजेगाव गणातून उमेदवार संजय संपत भोसले



**इंदापूर । प्रतिनिधी -** दौंड पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिनांक २१ रोजी उमेदवारांचे नामनिर्देशन (फॉर्म भरण्याची) प्रक्रिया दौंड तहसील कार्यालयात पार पडली. या प्रक्रियेदरम्यान विविध पक्षांच्या उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केल्याने तालुक्यातील राजकीय वातावरण तापलेले दिसून आले.राजेगावखडकी गणातून पंचायत समितीसाठी भाजपकडून विठ्ठल भाऊसाहेब मोघे, तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून संजय संपत भोसले यांनी उमेदवारी अर्ज भरला. यामुळे या गणातील लढत रंगतदार होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. जिल्हा परिषद गटाबाबतही महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. (तुतारी गट) कडून आप्पासाहेब पवार,यांचा एबी फॉर्म भाजप चिन्हावर भरला गेल्याने राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. तसेच, जिल्हा परिषद उमेदवार म्हणून वीरधवल जगदाळे,यांचा फॉर्मही राष्ट्रवादीकडूनच दाखल करण्यात आला.याच प्रक्रियेत भाजपचे नेते वासुदेव काळे,यांच्या कन्या डॉ. हर्षदा काळे,यांनीही आपला उमेदवारी अर्ज भरल्याने निवडणुकीतील समीकरणे आणखी रोचक बनली आहेत.तालुक्यात दररोज घडणाऱ्या राजकीय हालचाली, पक्षांतील समीकरणे, आघाड्यापाठिंबा यामुळे मतदारांसमोर वेगवेगळी चित्रे उभी राहत आहेत. कोणत्याही क्षणी अनपेक्षित घडामोडी घडू शकतात, हे या उमेदवारी प्रक्रियेवरून स्पष्ट झाले आहे. परिणामी, दौंड तालुक्याचे लक्ष या निवडणुकीकडे केंद्रित झाले असून मतदारांमध्येही चर्चा चांगलीच रंगलेली दिसून येत आहे. त्यामुळे खडकी देऊळगाव गणामध्ये सर्वांचे लक्ष लागून राहिलेले आहे.

# शिक्षण संस्था सचिव, अध्यक्ष व मुख्याध्यापकांकडून होणाऱ्या शासणाची आर्थिक फसवणूक शिक्षकांच्या आर्थिक पिळवणूक

### शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर शिक्षकांच्या आमरण उपोषणाला सुरुवात!

**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** जटवाडा रोडवरील अंबरहिल येथील पलक हरिप्रिया शैक्षणिक व सामाजिक बहुउद्देशीय विकास संस्था संचालित राजश्री शाहू महाराज प्राथमिक शाळेतील शिक्षकांची संस्थाचालक आणि मुख्याध्यापकां कडून आर्थिक पिळवणूक आणि शासणाची आर्थिक लूट होत असल्याने याच शाळेतील सहशिक्षक श्री बाळू वैजिनाथ पवार हे मराठवाडा शिक्षक संघाच्या भाई चंद्रकांत चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आज दिनांक २२ जानेवारी २०२६ वार गुरूवार रोजी जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी प्राथमिक कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. या शिक्षण संस्थेचे सदस्य हिरालाल येडुजी गतखने हे असून संस्थेच्या अध्यक्षा दुर्गा हिरालाल गतखने आणि संस्था सचिव ऋषिकेश हिरालाल गतखने हे आहे. शाळेचे मुख्याध्यापक योगेश मानसिंग राठोड हे आहेत. संस्थाचालक आणि मुख्याध्यापक हे शासनाची आर्थिक लूट व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी खेळत आहेत यात प्रशासन देखील यांना मदतच करीत आहेत.

संघटनेच्या प्रमुख मागण्या : बोगस विद्यार्थी व बोगस आधार गैरवापर शाळेने करून सदरील विद्यार्थी व पालकांची दिशा भूल करून शासनाच्या तिजोरीची आर्थिक लूट केली आहे याबाबत आपण फौजदारी व दंडात्मक कारवाई करणे अपेक्षित आहे. तर खुद्द तक्रारदार श्री. पवार बाळू वैजनाथ (सहशिक्षक) आणि त्यांच्या मुलाच्या आधार कार्डाचा बोगस वापर करून त्यांना विद्यार्थी म्हणून पोर्टलवर दाखवल्याचा



गंभीर गुन्हा केला आहे. हा आयडेंटिटी थेफ्ट ( ) चा प्रकार आहे. २) प्रशासकीय निष्क्रीयता आपल्या कार्यालयाने शाळा तपासणीचे पत्र काढूनही प्रत्यक्ष तपासणी टाळली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्राथमिक तपासणीत बोगस विद्यार्थी आढळून आले असतानाही अहवाल दडपला जात आहे. ३) शालेय पोषण आहारातील आर्थिक लूट करणाऱ्या संस्था सचिव व मुख्याध्यापक यांच्यावर तात्काळ गुन्हा नोंदविण्यात याव. ४) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये आपल्या कार्यालयातील अहवालात विद्यार्थी संख्या १४४ असूनही संचमान्यतेत शिक्षक संख्या वाढीव आलेली आहे. व शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील पटपडताळणी याबाबत हे दोन अहवाल मिळणे. ५) वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करणे व सेवा पुस्तिकेची द्वितीय प्रत अद्यावत करून देण्यात यावी. या प्रमुख मागणीसाठी हे आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. अशोक ढमढेरे, विनोद केनेकर, कृष्णा गोंडे, विलास चव्हाण, पद्माकर पगार, रावसाहेब बोरसे, अजित जाधव, संभाजी जाधव, रवींद्र मगर, रामेश्वर गोराडे, सचिन मुसळे, सागर सूर्यवंशी, सोनाली गव्हाणे, स्वाती बोंडे, रेखा साकळे, अरुणा चौधरी, सविता हिंगे, शितल कवडे यांनी या आमरण उपोषणाला पाठिंबा दिला आहे.

## कला विज्ञान व वाणिज्य महाविदयालायांमध्ये आयोजित पत्रकार सन्मान सोहळ्यामध्ये पत्रकारांचा सन्मान

**इंदापूर । प्रतिनिधी -** पत्रकार समाज प्रबोधनाचे काम करतात, तर शैक्षणिक संस्था शिक्षणाच्या माध्यमातून समाज घडवितात. पत्रकार आणि शाळा-महाविद्यालये हे समाजातील अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. पत्रकार आणि शैक्षणिक संस्था यांनी परस्पर समन्वय ठेवून कार्य केल्यास व्यापक समाजप्रबोधन साध्य होईल असे मत कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तानाजी मगर यांनी व्यक्त केले.

येथील इंदापुर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये पत्रकार दिनानिमित्त पत्रकार सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तानाजी मगर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ पत्रकार भरत मल्लाव, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष आकाश पवार, भिगवण पत्रकार संघाचे अध्यक्ष विजयकुमार गायकवाड, जनसेवा पत्रकार संघाचे अध्यक्ष बबनराव धायतोंडे, प्रा. संदीप साठे व्यासपिठावर उपस्थित होते. डॉ.मगर पुढे म्हणाले, पत्रकार निस्पृहपणे समाजासाठी जे कार्य करीत आहेत त्याची समाजाने दखल घेऊन त्याबद्दल त्यांचा सन्मान होणे आवश्यक आहे.




यावेळी भरत मल्लाव, आकाश पवार, विजयकुमार गायकवाड, बबनराव धायतोंडे, नितीन चितळकर, डॉ. काशीनाथ सोलनकर, तुषार क्षीरसागर, महेंद्र काळे, संतोष सोनवणे, अनिल खाडे, संतोष सवाणे, सागर जगदाळे, योगेश चव्हाण, संतोष पवार, महादेव बंडगर, अमोल कांबळे, निलेश मोरे, सागर घरत, तुषार हगारे, निलेश गायकवाड, अरुण भोई, संजय शिंदे, प्रवीण वाघमोडे, गोरख पोंदकुले आदी पत्रकारांचा सन्मान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तानाजी मगर, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी भरत मल्लाव, डॉ. काशीनाथ सोलनकर, निलेश गायकवाड, तुषार क्षीरसागर, महादेव बंडगर आणि यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी पत्रकारिता करताना येणाऱ्या अडचणी, पत्रकारिता क्षेत्रामध्ये होत असलेले बदल, समाजातील वास्तव मांडण्याची जबाबदारी आणि शैक्षणिक संस्थांशी असलेले नाते यावर आपले विचार मांडले तसेच महाविदयालयाच्या वतीने करण्यात आलेल्या सन्मानाबदद्ल आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. महादेव वाळुंज यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. प्रशांत चवरे यांनी तर डॉ. बाळासाहेब खरात यांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रमासाठी महाविदयालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## खामखेडा येथील जि.प.प्रा शाळेला दीड लाखांची भरीव मदत

### स्व. सुखदेवराव फदाट यांच्या पुण्यस्मरणार्थ नूतनीकरण उपक्रम



**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** तालुक्यातील खामखेडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत स्व. सुखदेवराव झिंगराजी पा. फदाट यांच्या पुण्यस्मरणार्थ शाळेच्या इमारतीचे नूतनीकरण करण्यात आले. या अंतर्गत शाळेची जुनी पत्रे बदलून नवीन पत्रे बसविण्यात आली तसेच संपूर्ण इमारतीची रंगरंगोटी करण्यात आली. हा उपक्रम इंडिगो उत्सव कंपनीच्या माध्यमातून युवा उद्योजक नाना सुखदेवराव फदाट (नाना पाटील) यांच्या पुढाकाराने राबविण्यात आला असून यासाठी सुमारे दीड लाख रुपयांची आर्थिक मदत शाळेला देण्यात आली.

''शाळेला आधार गावाचा ,गावाला अभिमान शाळेचा'' या भावनेतून नाना फदाट यांनी आपल्या वडिलांच्या स्मृती जपत शैक्षणिक क्षेत्रासाठी सामाजिक बांधिलकी जपली आहे. या कार्यामुळे शाळेचे रूपडे पालटले असून विद्यार्थ्यांना स्वच्छ, सुरक्षित व प्रेरणादायी वातावरण मिळाले आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी केलेले हे योगदान गावासाठी अभिमानास्पद ठरत आहे.

या निमित्ताने इंडिगो उत्सव कंपनीतर्फे शाळेत विशेष कार्यक्रमाचे आयोजन १९/०१/२०२६ रोजी करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाना फदाट होते. प्रमुख पाहुणे म्हणून इंडिगो कंपनीचे छत्रपती संभाजीनगर येथील सोहेल चाऊस, सचिन चव्हाण, ज्येष्ठ पत्रकार मोहनभाऊ मुळे, रामदास जाधव (माजी उपसरपंच), सांडू फदाट (उपसरपंच) जगन फदाट,रामदास फदाट ,शिवाजी फदाट, भरत पंडित, मोतीराम म्हस्के,यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष योगेश पाटील फदाट, शाळेचे मुख्याध्यापक सोपान शिंदे, सहशिक्षक माधव शिंदे ,संदीप डोबले, तालुक्यातील पेंटर बांधव, महिला मंडळ, विद्यार्थी-विद्यार्थिनी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी जिल्हा परिषद शाळांचे जतन व संवर्धन करण्यासाठी पालक, शिक्षक आणि समाज यांनी एकत्र येऊन सहकार्य करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी नाना फदाट यांच्या वतीने विद्यार्थ्यांना व उपस्थितांना जेवणाची मेजवानी देण्यात आली. हा उपक्रम केवळ शाळेच्या भौतिक सुविधांपुरता मर्यादित न राहता समाजातील शिक्षणप्रेम आणि कृतज्ञतेची भावना अधोरेखित करणारा ठरला आहे.

# मंठा शहरात कायदा सुव्यवस्थेचे तीन तेरा

### रस्त्यावरील पार्किंग व वाहतूक कोंडीकडे पोलिसांचे दुर्लक्ष; नागरिकांत तीव्र संताप

**मंठा । प्रतिनिधी -** शहरात सध्या कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती गंभीर बनली असून, रस्त्यावरील बेशिस्त र्पाकिगं, वाढती वाहतूक कोंडी आणि नियमांचे सर्रास उल्लंघन यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. मंठा पोलीस ठाण्यात मनोजकुमार राठोड यांनी पोलिस निरीक्षक म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर शहरातील परिस्थिती अधिकच बिघडल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठ, चौक-चौरस्त्यांवर दुचाकी, चारचाकी वाहने मनमानी पद्धतीने उभी केली जात आहेत. त्यामुळे दिवसभर वाहतूक कोंडी होत असून, शालेय विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णवाहिकांनाही अडथळ्यांना सामोरे जावे लागत आहे.

विशेष म्हणजे वाहतूक नियंत्रणासाठी नियमित कारवाई होत नसल्याने वाहनचालकांना कायद्याचा कोणताही धाक उरलेला नाही, अशी भावना सर्वसामान्यांमध्ये आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, पोलिस निरीक्षकांनी पदभार स्वीकारल्यापासून वाहतूक नियंत्रण, अवैध पार्किंगवर कारवाई, तसेच किरकोळ गुन्ह्यांवर तत्काळ दखल घेण्याचे प्रमाण कमी झाले आहे. याचा थेट परिणाम शहरातील कायदा सुव्यवस्थेवर होत असून, गुन्हेगारी प्रवृत्तीला खतपाणी मिळत असल्याचा आरोप केला जात आहे.

दरम्यान, पोलिस निरीक्षक मनोजकुमार राठोड रुजू होताच जप्त गुन्ह्यांतील वाहनांची विक्री झाल्याचा आरोप झाल्याने ते याआधीच चर्चेत आले होते. या प्रकरणामुळे पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पारदर्शक चौकशीची मागणी नागरिकांकडून होत आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल यांनी मंठा शहरातील परस्थितीकडे लक्ष द्यावे, अशी जोरदार मागणी होत आहे. शहरात तातडीने वाहतूक नियोजन राबवणे, रस्त्यावरील अवैध पार्किंग हटवणे, नियम मोडणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे आणि कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी ठोस पावले उचलणे अत्यावश्यक बनले आहे.

जर लवकरात लवकर ठोस कारवाई झाली नाही, तर नागरिक आंदोलनाचा मार्ग अवलंबतील, असा इशाराही काही सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे.

त्यामुळे आता पोलिस प्रशासन आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची भूमिका काय असते, याकडे संपूर्ण मंठा शहराचे लक्ष लागले आहे.

## पूर्ण विश्वास ठेवा - रोहित पाटील

**सांगली -** जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी आमदार रोहित पाटील यांनी ''ठेवलाच आहे विश्वास तर पूर्णच ठेवून बघा'' ही टॅगलाईन निश्चित केली आहे. विधानसभेला लोकांनी ज्या विश्वासाने निवडून दिले, तसाच विश्वास आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती उमेदवारांवर ठेवावा, असे आवाहन रोहित पाटील यांनी केलं आहे. राज्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत चर्चा सुरू असल्या तरी आम्ही या निवडणुका तुतारी चिन्हावर लढवू असेही रोहित पाटील म्हणाले. तासगाव नगरपालिका विरोधकांनी जिंकल्यामुळे या निवडणुकीत आम्हाला फार मोठे आव्हान निर्माण होईल असं वाटत नाही असेही रोहित पाटील म्हणालेत.

### जालना तेरापंथ महिला मंडळातर्फे सर्वाइकल कॅन्सरबाबत जनजागृती

# महिलांनी आरोग्याबाबत जागरूक राहून वेळेवर तपासणी करणे गरजेचे-डॉ. आरती मंत्री

**जालना । प्रतिनिधी -** जालना तेरापंथ महिला मंडळाच्यावतीने ‘आरोग्यम’ कार्यक्रमांतर्गत सर्वाइकल कॅन्सर (गर्भाशय मुखाचा कर्करोग) आणि पॅप स्मीअर चाचणीबाबत जनजागृती करण्यात आली. महिलांच्या आरोग्याप्रती सजगता निर्माण करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमाला समाजातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेल्या स्त्री रोग तज्ञ डॉ. आरती मंत्री यांनी सर्वाइकल कॅन्सर म्हणजे काय, त्याची लक्षणे आणि हा आजार होण्याची कारणे यावर अत्यंत सोप्या भाषेत प्रकाश टाकला. महिलांनी स्वतःच्या आरोग्याबाबत जागरूक राहून वेळेवर तपासणी करणे किती आवश्यक आहे, हे त्यांनी पटवून दिले. कर्करोगग्रस्त रुग्णाला बिचारा समजून सहानुभूती दाखवण्यापेक्षा, हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो, असा विश्वास आणि सांत्वन देणे हे समाजाचे कर्तव्य आहे. महिलांनी या आजाराला न घाबरता धैर्याने सामोरे जावे, असा मौलिक सल्ला डॉ. आरती मंत्री यांनी दिला.

मंडळाच्या अध्यक्षा ज्योतिबाला सेठिया यांनी अध्यक्षीय भाषणात ‘आरोग्यम’ अभियानाच्या उद्दिष्टांची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाची सुरुवात महिला मंडळाच्या सदस्यांनी सादर केलेल्या मंगलचरणाने भक्तीमय वातावरणात झाली.

आरोग्यविषयक मार्गदर्शन सत्रानंतर महिला मंडळाच्यावतीने मकर संक्रांतीनिमित्त पारंपारिक हळदी-कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महिलांना तिळगुळ आणि भेटवस्तू देऊन शुभेच्छा देण्यात आला. मनोरंजनासाठी आयोजित करण्यात आलेल्या ‘हौजी’ खेळाने कार्यक्रमात अधिक रंगत आणली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता बोथरा यांनी केले तर मंडळाच्या मंत्री नेहा बोथरा यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला तेरापंथ महिला मंडळाच्या सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.